# हवामान आधारीत कृषि सल्ला
# ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
# कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**९५) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि:२७.०१.२०२३**

जिल्हा : अहमदनगर

| मागील आठवड्यातील हवामान (२०/०१/२०२३ ते २६/०१/२०२३) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२८/०१/२०२३ ते ०१/०२/२०२३) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | दिनांक | २८ | २९ | ३० | ३१ | ०१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | २ | ३ | ० | ० |
| ३१.६ | ३०.८ | ३१.० | ३०.२ | ३०.२ | २९.८ | २७.४ | कमाल तापमान (अंसे) | ३० | २८ | २७ | २७ | २७ |
| १६.३ | १४.९ | १४.७ | १३.९ | १३.४ | १६.५ | १७.९ | किमान तापमान (अंसे) | १४ | १२ | १० | १२ | १२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | २.० | ढगस्थिती (आकाश) | ० | ० | ३ | २ | ४ |
| ६९ | ७९ | ७७ | ७७ | ८३ | ६४ | ७६ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६९ | ७० | ७४ | ६८ | ६५ |
| २८ | २९ | ३० | ३२ | ४३ | ४८ | ४७ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४७ | ६२ | ६५ | ५८ | ५४ |
| १.० | २.० | १.५ | १.३ | १.६ | १.६ | ०.७ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ११.८ | ११.४ | १३.३ | ११.३ | १६.८ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचे कडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील २९ जानेवारी ते 1 फेब्रुवारी रोजी आकाश अंशतः ढगाळ राहील. तसेच दि. २९ व ३० जानेवारी रोजी काही ठिकाणी अतिशय हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. पावसाची शक्यता असल्याने काढणी केलेल्या पिकांना सुरक्षित ठिकाणी झाकुण ठेवावे. |
| संदेश | | **मका:** मक्यावरील लष्करी आळी (फॉल आर्मी वर्म) या आळीचा प्रादुर्भाव दिसताच १० मिली इंडोक्साकार्ब १५.८ ईसी किवा इमामेक्टिन बेंझोएट ५ एसजी प्रती १० लि पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| हरभरा | | हेलिकोव्हरपा अळीच्या नियत्रणाकरीता ५० मिली कडूनिबाचे तेल किवा ५० ग्राम बेव्हेरिया बेसियांना प्रती १५ लि पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मका | | मक्यावरील लष्करी आळी (फॉल आर्मी वर्म) या आळीचा प्रादुर्भाव दिसताच १० मिली इंडोक्साकार्ब १५.८ ईसी किवा इमामेक्टिन बेंझोएट ५ एसजी प्रती १० लि पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| सुरु ऊस | लागवड | सुरु उस लागवड १५ फेब्रुवारी पर्यंत पूर्ण केल्यास उस उत्पादकता व साखरेचा उतारा चांगला मिळतो. आडसाली उस लागवडीसाठी को. ८६०३२ (नीरा) किंवा को.एम.०२६५ (फुले २६५) या जातींची निवड करावी. एक डोळा रोपांपासून (३० ते ४५ दिवस वयाच्या रोपांची) ऊस लागवड करावी त्यामुळे नेहमीच्या तुलनेत ऊस लागणीस ३० ते ४५ दिवसांपर्यंत जोपासण्यासाठी लागणारे पाणी, तण नियंत्रण, खते,देखरेख यांची बचत होते. बेण्याद्वारे लागवड करावयाची असल्यास बेणे मळयात वाढवलेले ९ ते १० महिने वयाचे निरोगी, रसरशीत आणि अनुवांशिक दृष्ट्या शुद्ध ऊस बेणे वापरावे. |
| कांदा | वाढ | करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास , डायथेन एम ४५ (०.३%) किंवा टेब्यूकोनॅझोल (०.१%) हे बुरशीनाशक १० ते १५ दिवसांच्या अंतराने आलटून पालटून फावारावेत. |
| तूर | काढणी | तुरीच्या शेंगा वाळल्यावर पीक कापून घ्यावे व खळयावर मळणी करावी. तूर पिकाचा खोडवा घेवू नये कारण वांझ रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. |
| मिरची | | लीफ कर्ल विषाणूच्या व्यवस्थापनासाठी , झाडाचा प्रादुर्भाव झालेला भाग काढून टाका आणि व्हेक्टर पांढर्याझ माशीच्या नियंत्रणासाठी ३ ग्रॅम एॅसिटामिप्रिड २० एसपी १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| रब्बी ज्वारी | दाणे भरणे ते पक्वता | पक्व होत असलेल्या ज्वारी पिकाचे पक्षांपासून संरक्षण करावे. |
| मोहरी | | माव्याच्या नियंत्रणासाठी १० मिली डायमेथोएट ३० ईसी किंवा १० ग्रॅम एॅसेफेट ७५ एसपी प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पिकावर फवारणी करावी. |
| पशुधन | जनावरांची हिवाळयात घ्यावयाची काळजी | हा ऋतू आरोग्यदायक असला तरी लहान करडे/ कोकरे/ वासरे यांचे थंडीपासून संरक्षण करणे गरजेचे आहे. जनावरांना जास्तीत जास्त ऊर्जा मिळण्यासाठी जनावरांच्या आहारात शेंगदाणा पेंड/ सरळी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास पेंड/ सरळी पेंड यांचा वापर वाढवावा. शक्य असल्यास बायपास फॅट व प्रथिनयुक्त आहार द्यावा. क्षार व जीवनसत्त्वांचे मिश्रण वाढवावे. सकाळच्या वेळी हिरवा चारा व रात्रीच्या वेळी वाळलेला चारा द्यावा. चराऊ जनावरांना चरण्यासाठी नेताना सकाळी उशिरा न्यावे , जेणेकरून गवतावर दहिवर नसेल. गोगलगाईचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी जनावरे चरावयास नेऊ नयेत. सर्दीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास जनावरांच्या नाकाभोवती टरपेंटाईनचा बोळा फिरवावा. सर्दीचा रंग हिरवट-पिवळसर असल्यास तातडीने पशुवैद्यकाच्या सल्ला घ्यावा. जनावरांचे पिण्याचे पाणी अतिथंड नसावे. जनावरे धुवायची झाल्यास शक्यतो दुपारच्या वेळी धुवावीत. जनावरांना लाळ्या-खुरकुज आजारापासून संरक्षणासाठी लसीकरण करावे. |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**स्त्रोत :**
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि , राहुरी.

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : २७.०१.२०२३

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**